# <u>महाराष्ट्र पोलीस उत्कृष्ट कामगिरी पुरस्कार, फेब्रुवारी - २०२६</u>

महाराष्ट्र पोलीस दलाच्या वतीने फेब्रुवारी २०२६ करिता देण्यात येणाऱ्या "**सर्वोत्कृष्ट गुणात्मक अन्वेषण" पुरस्कार -** गोंदिया जिल्हा पोलीस व **"सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी" पुरस्कार -** ठाणे शहर पोलीस दलातील तपास पथकांची निवड करण्यात आली आहे.

गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा पोलिसांनी कोणत्याही प्रत्यक्ष साक्षीदाराशिवाय केवळ घटनास्थळी मिळालेल्या दोरीच्या आधारे मायक्रो फायनान्स कर्मचाऱ्याच्या हत्येचा छडा लावून क्लिष्ट गुन्हयातील आरोपींना अटक केली आहे. याकरीता "**सर्वोत्कृष्ट गुणात्मक अन्वेषण"** पुरस्कारासाठी निवड करण्यात आली

ठाण्यातील दिवा खाडीत लोखंडी पेटीत हातपाय बांधलेल्या अवस्थेत एका व्यक्तीचा मृतदेह आढळल्याप्रकरणी शिळ डायघर पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींना अटक केली. तपास पथकाने या गुन्हयात गोळा केलेले सबळ वस्तुनिष्ठ पुरावे आणि न्यायालयात मांडलेली मुद्देसूद बाजू यामुळे आरोपींवरील आरोप शंकेपलीकडे सिद्ध झाले. या यशस्वी तपासामुळे दि. २५/०२/२०२६ रोजी सत्र न्यायालयाने दोन्ही आरोपींना जन्मठेप आणि प्रत्येकी २०,००० रुपये दंडाची शिक्षा सुनावली. पोलिसांनी केलेल्या या कौतुकास्पद कायदेशीर पाठपुराव्यामुळे गुन्हेगारांना योग्य शिक्षा मिळवून देण्यात यश आले आहे. याकरीता **"सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी"** पुरस्कारासाठी निवड करण्यात आली

दिनांक १० एप्रिल २०२६ रोजी राज्याचे पोलीस महासंचालक श्री सदानंद दाते यांच्या हस्ते गोंदिया पोलीस दलाचे पोलीस निरीक्षक भूषण बुराडे, पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम अहेरकर, सपोनि किशोर मावसकर, पोलीस हवालदार विठ्ठलप्रसाद ठाकरे व पोलीस नाईक दिनेश जांभुळकर यांना "**सर्वोत्कृष्ट गुणात्मक अन्वेषण"** तसेच ठाणे शहर पोलीस दलाचे पोलीस निरीक्षक (तत्कालीन) श्री. रामचंद्र काशीनाथ मोहिते व त्यांचे मदतनीस पोलीस हवालदार सचिन माधव सावळे यांना **"सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी"** या पुरस्काराने रोख रक्कम व प्रशस्तीपत्र प्रदान करून गौरवण्यात आले. तसेच त्यांच्या पुढील वाढचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# फोटो







